नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १६४ Issue - 164 | वार बुधवार दि. ३० ऑक्टोबर २०२४ Blow- Wednesday Date 30 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

ज्येष्ठांना मिळणार आयुष्मान भारत अंतर्गत ५ लाखांपर्यंतचे मोफत उपचार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ज्येष्ठांना दिवाळी गिफ्ट, ५ लाखांपर्यंत दरवर्षी मिळणार लाभ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : नवी दिल्ली : देशातील जनतेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मोठी घोषणा केली. देशातील ७० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्या जेष्ठांना नरेंद्र मोदी यांनी दिवाळीची भेट दिली. मोदी यांनी आयुष्मान योजनाचा नवीन टप्पा आयुष्मान भारत निरामयम योजना सुरु केली. दिल्लीमधील ऑल इंडिया इंस्टीट्यूट ऑफ आयुर्वेद (खख) मध्ये आयोजित कार्यक्रमात १२ हजार ८५० कोटी रुपयांची ही योजना लागू केली. आता ७० वर्ष आणि त्यापेक्षा जास्त वय असणारे सर्व वयोवृद्ध व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार

आहे. या सर्वांचा आरोग्य विमा योजना आयुष्मान भारत अंतर्गत ५ लाखांपर्यंतचे मोफत उपचार मिळणार आहे. पाच लाखांपर्यंतच्या विमा योजनेचा लाभ दरवर्षी मिळणार आहे.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (इ झच-गध) या योजनेत ७० वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या वृद्धांसाठी आहे. उत्पन्नाची त्यासाठी कोणतीही अट नाही. या योजनेचा लाभ कोणत्याही उत्पन्न गटातील व्यक्तीला मिळणार आहे.

तसेच जे परिवार या योजनेचा आधीपासून लाभ घेत आहे, त्या परिवारातील वृद्ध सदस्यांसाठी वार्षिक ५ लाख रुपयांपर्यंतचे स्वतंत्र उपचार उपलब्ध असणार आहेत. त्याचा फायदा देशातील सुमारे ४.५ कोटी कुटुंबांतील ६ कोटींहून अधिक वृद्धांना होणार आहे. या योजनेत आत्तापर्यंत केवळ अल्प उत्पन्न गटातील कुटुंबांचा समावेश होता. मात्र, या योजनेत वृद्धांसाठी सुरू करण्यात आलेल्या कोणतीही उत्पन्न मर्यादा असणार नाही.

वृद्ध व्यक्तींना या योजनेत आयुष्मान कार्ड दिले जाणार आहे. ज्या कुटुंबाला आयुष्यमान योजना अजून लागू झालेली नाही त्यांना स्पेशल कार्ड २९ ऑक्टोंबरपासून मिळणार आहे. दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही ज्येष्ठ सदस्यांना प्रातिनिधिक स्वरुपात आयुष्यमान कार्ड दिले. आयुष्मान कार्ड बीआयएस पोर्टल https://bis.pmjay.gov.in/ किंवा आयुष्मान पद्वारे मिळेल. त्यासाठी वृद्धांना त्यांचं

आधार कार्ड आणि केवायसी देखील अपडेट करावे लागेल. ज्या वृद्धांकडे खाजगी आरोग्य विमा असेल त्यांना खाजगी आणि आयुष्मान भारत योजना विमा यापैकी एक निवडण्याचा पर्याय असेल.

भारत-चीन सीमावाद : भारतीय सैनिकांना पूर्वीप्रमाणे गस्त घालता येणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारत आणि चीन यांच्यात २०२० पासून सुरु असलेला सीमावाद आता संपुष्टात येणार आहे. दोन्ही देशांनी वादग्रस्त भागातून सैन्य माघारी घेण्याचे तसेच या भागातील अस्थायी चौक्या हटवण्याचे मान्य केलं आहे.

त्यानुसार सैन्य मान्य मागे घेण्याची तसेच चौकी हटवण्याची प्रक्रिया आज पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देप्सांग पठार आणि देम्चोक या दोन ठिकाणी आता भारतीय सैनिकांना मे २०२० पूर्वीप्रमाणे गस्त घालता येणार आहे. यासंदर्भात लष्करातील सूत्रांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितलं, की दोन्ही देशांनी या भागातील सैन्यही मागे बोलवलं आहे. तसेच या भागातील अस्थायी चौक्या हटवण्याची प्रक्रिया जवळपास संपुष्टात आली आहे. आता दोन्ही देशांच्या अधिकारी या भागांची पाहणी करत आहेत. या पाहणीदरम्यान ड्रोन्सची मदतही घेतली जात आहे. ही पाहणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भारतीय सैनिकांना

पूर्वीप्रमाणे गस्त घालता येणार आहे. मात्र, भारतीय सैनिकांना याची पूर्व कल्पना चीनच्या सैनिकांना देणे बंधकारक आहे. गस्त घालताना दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये कोणताही तणाव निर्माण होऊ नये, हा यामागचा उद्देश आहे.

रेकॉर्ड ब्रेक मतदानाने सचिन कल्याणशेट्टी निवडून येणार : गोवा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत

शक्तीप्रदर्शन करत आ. सचिन कल्याणशेट्टींचा अर्ज दाखल

गोव्याच्या मुख्यमंत्र्यांसह महायुतीतील पदाधिकाऱ्यांची हजेरी; कार्यकर्त्यांची अलोट गर्दी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/ प्रतिनीधी : अक्कलकोट विधानसभा निवडणुकीकरिता भाजपाचे उमेदवार आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रदिप सावंत, शिवानंद पाटील, शहाजी (बापू) पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत बनसोडे यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी बोलताना गोव्याची मुखमंत्री सावंत म्हणाले की,यंदा दुप्पट मतांनी विजय होणार तुम्ही सारेजण सकाळपासून मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जमा झालात. तुमच्या प्रेमामुळे, ९० हजार बहिर्णीच्या आशीर्वादामुळे आणि सचिन कल्याणशेट्टी मागील वर्षापेक्षा दुप्पट मताने विजयी होणार हे निश्चित पुढे म्हणाले की, अक्कलकोट विधानसभा मतदार संघातून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मी स्वतः आलो असून सचिन

दादा यांची तालुक्यात लोकप्रियता असून सामान्य नेता म्हणून आज येवढ्या मोठ्या संख्येने जनता आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित आहे यावरून समजत आहे की सचिन कल्याणशेट्टी रेकॉर्ड ब्रेक मताने विजय होतील

याप्रसंगी मोतीराम राठोड, सुरेखा होळीकट्टी, मंगल (काकू) कल्याणशेट्टी,यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, सिध्देश्वर कल्याणशेट्टी, सिध्देश्वर मठपती, नागराज कुंभार, शिवनेना तालुका प्रमुख संजय देशमुख, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, चंद्रकांत दसले, विकास तळवार, राजकुमार झिंगाडे, मल्लिनाथ स्वामी, प्रभाकर मजगे, मीलन कल्याणशेट्टी, रीपाई तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे उपस्थित होते.

विकासाचा वादा, सचिनदादा, एकच वादा, सचिन दादा घोषणांनी अक्कलकोट दुमदुमले. सुमारे २५ ते ३० हजार कार्यकर्ते आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सकाळी १०.३० पासून खंडोबा मंदिर बसस्थानक येथे जमले होते. सकाळी सर्वप्रथम आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन उमेदवारी अर्ज भरण्यासाठी

तहसील कार्यालयकडे प्रयाण केले. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर खंडोबा मंदिर येथून वाद्यांच्या गजरात

रॅली मध्ये कल्याणशेट्टी संपूर्ण परिवार सहभाग होते त्यांनी मतदारांना संवाद साधत होते यावेळी ढोल ताशा विविध कलाचे प्रकार सादर करण्यात आले हलगीच्या तालावर कार्यकर्ते डान्स करत होते एक दरीत मोठ्या उत्साहात सचिन दादा कल्याणशेट्टी उमेदवारी अर्ज दाखल केले

रॅली काढण्यात आली. विजय कामगार चौक, कारंजा चौक, कापड बाजार, समर्थ चौक, फत्तेसिह चौकमार्गे कमलाराजे चौकपर्यंत भव्य रॅली काढण्यात आली.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रदीप सावंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली देश विकसित भारताकडे वाटचाल करीत आहे. याबरोबरच उपमुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांनी अक्कलकोट विकासाकरिता कोट्यावधीचा निधी दिले आहे त्यामुळे अक्कलकोट विधान सभा विकसित मतदारसंघाकडे चालू आहे.

यावेळी , सागर कल्याणशेट्टी, मल्लिनाथ कल्याणशेट्टी, शांभवी कल्याणशेट्टी, , शिवशरण जोजन, अविनाश महागांवकर, महेश हिंडोळे, मल्लिनाथ स्वामी, प्रभाकर मजगे, संदीप कत्ते, नागेश कुंभार, लखन झंपले, कांतू धनशेट्टी, राजू झिंगाडे, मल्लिनाथ आळगी, बंटी राठोड, राजशेखर मसुती, चंद्रकांत दसले, धनंजय गाडवे, नागेश कलशेट्टी, निजपा गायकवाड, कमलाकर सोनकांबळे, बसवराज शेळके, प्रदीप जगताप, धोडूराज बनसोडे, अमोल पुटगे, बलवान गोतसुर्वे आकाश माने, आदी उपस्थित होते.

संपादकीय....

आयोगाच्या सूचना

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत वाढलेल्या राजकीयदृष्ट्या प्रेरित गुन्ह्यांबद्दल तीव्र चिंता व्यक्त करतानाच अशा गुन्ह्यांना वेळीच आळा घालण्याचे आदेश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी मंगळवारी राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांना दिले. निवडणुकीत राजकीय वातावरण गढूळ करणाऱ्या कोणाचीही गय करु नका, अशा कठोर सूचनाही आयोगाने दिल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगाने मंगळवारी महाराष्ट्र, झारखंड आणि त्यांच्या शेजारील राज्यांचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक तसेच अन्य उच्चाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. बैठकीदरम्यान राजीव कुमार यांनी महाराष्ट्रातील वाढत्या राजकीयदृष्ट्या प्रेरित गुन्ह्यांबाबत चिंता व्यक्त केली. अशा घटनांमुळे राज्यातील निवडणुकीचे वातावरण दूषित होत असून निवडणूक प्रक्रियेत बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या प्रेरित गुन्हयांवर कडक नियंत्रण ठेवण्याचे आणि अशा गुन्हयांत निष्पक्ष राहून कोणालाही पाठीशी न घालण्याचे आदेश पोलीस महासंचालकांना दिल्याचे सूत्रांनी सांगितले. राज्यात काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येमुळे राज्यात राजकीय खळबळ उडाली होती. चार दिवसांपूर्वी अहिल्यानगरमध्येही काँग्रेस आणि भाजपच्या नेत्यांच्या संघर्षात भाजपच्या एका नेत्याने काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या मुलीबद्दल केलेल्या वाद्गस्त वक्तव्यावरुनही राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. या पार्श्वभूमीवर आयोगाने राज्यातील कायदा सुव्यस्था बिघडणार नाही याबाबत दक्षता घेण्याची सूचनाही महासंचालकाना केल्याचे समजते. निवडणूक आयोगाने निवडणूक काळात राज्यांमध्ये रोकड, मद्या, अमली पदार्थ, मौल्यवान वस्तू आणि इतर मोफत वस्तूंसह प्रलोभनांचा प्रवाह रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे कठोर आदेश यावेळी दिले. राज्याच्या सीमेवर बंदोबस्त वाढवा, तपासणी वाढवा तसेच सतर्क राहून शेजारील राज्यातून पैसे, मद्या वा मौल्यवान वस्तू राज्यात येणार नाहीत याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही आयोगाने दिल्या आहेत. विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून आतापर्यंत ३४५ कोटी रुपये जप्त करण्यात आले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातून १७५ कोटी रुपये आणि झारखंडमधून ११४ कोटी रुपये जप्त करण्यात आले असून उर्वरित रक्कम पोटनिवडणूक होत असलेल्या राज्यांमधून जप्त करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून जप्त केलेली रक्कम ही २०१९च्या निवडणुकीत जप्त केलेल्या रक्कमेच्या २.३ पट पट अधिक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

चेंगराचेंगरीच्या घटनांवर उपाययोजना आवश्यक

किमान दहा लोक जखमी झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले असून, या घटनेवर आता राजकारण सुरू झाले आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी वाहतूक ओव्हरफ्लो होती आणि त्यात दिवाळीच्या सुट्टीनिमित्त गावी जाणाऱ्या लोकांची प्रचंड गर्दी होती. त्यातच मुंबईच्या अति बंदोबस्त असलेल्या वांद्रे टर्मिनस येथे रविवारी चेंगराचेंगरीची भयंकर दुर्घटना घडली. त्यात किमान दहा जण किरकोळ जखमी झाले, तर दोन जण अतिगंभीर आहेत. इतक्या जीवघेण्या गर्दीतही प्रवाशांनी चालत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न केला आणि ते या दुर्घटनेचे शिकार झाले. घाटकोपरकडे जाणाऱ्या ट्रेनला पकडण्यासाठी भयंकर गर्दीत प्रवाशांनी प्रयत्न केला आणि या घटनेत भयंकर अफरातफरी माजली. या घटनेचा व्हीडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. स्थानकावर प्रचंड गोंधळ माजला होता आणि त्यातच ही दुर्घटना घडली. दिवाळी आणि त्यापाठोपाठ येणाऱ्या छट पूजा सणानिमित्त प्रवाशांची स्थानकात तुफान गर्दी झाली होती. अनेक प्रवाशांनी आपल्या जागा आरक्षित केल्या नव्हत्या आणि त्यांनाच या गर्दीचा सर्वात जास्त फटका बसला. वांद्रे-घाटकोपर अयोध्या एक्स्प्रेस ही गाडी फलाट क्रमांक १ वरून वांद्रे टर्मिनसच्या यार्डमध्ये चालली होती. ही गाडी ५-१० वाजता येथून सुटणार होती. पण सणासुदीच्या दिवसांत प्रवासी आरक्षित डब्यांमध्ये बसूनही प्रवास करण्याचा प्रयत्न करतात असे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रवासी पळत होते, काही जण जखमी झाले होते. त्यापैकी काही जण तर अति गंभीर होते. एका माणसाला रक्तस्राव होत असल्याचे व्हीडिओमधून दिसले. आता या घटनेवरून राजकारण सुरू झाले आहे. एक तर महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होत आहे आणि त्यात विरोधी पक्ष सरकारला या घटनेवरून घेरण्याची संधी सोडणार नाही हे स्पष्टच आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना घेरण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी म्हटले आहे की, वैष्णव हे सध्या बुलेट ट्रेनमध्ये गुंतले असल्याने मुंबईच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नात लक्ष घालण्यास त्यांना सवड नाही. आदित्य ठाकरे यांनी वैष्णव यांच्या असे अपघात टाळण्याच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पण ते विसरतात की, त्यांचे सरकार असताना कित्येक प्रकल्प तेव्हाच्या सरकारने बासनात गुंडाळून ठेवले होते. मेट्रो प्रकल्प असाच आता रेल्वे प्रशासनाने फलाटांच्या तिकिटांची विक्री करण्यासाठी काही नियम घालून दिले आहेत. पण त्यासाठी काही लोकांना चेंगराचेंगरीत जखमी व्हावे लागले. ही दुर्घटना घडल्यावर सीएसटी, दादर, कुर्ला आणि एल टीटी, कल्याण तसेच पुणे आणि नागपूर स्थानकांवर तिकीट विक्रीसंबंधी काही निर्देश लागू करण्यात आले आहेत. पण याचा अर्थ बैल गेला आणि झोपा केला असा होईल.

सणानिमित्त प्रचंड गर्दी आहे आणि रेल्वे प्रशासनाकडे इतक्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही. त्यामुळे आता प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी तिकीट काऊंटरवर तात्पुरते बंधन लादण्यात आले आहे. याचा काही उपयोग होईल असे वाटत नाही पण निदान मनुष्यहानी तरी होणार नाही. सेंट्रल रेल्वेकडून जारी केलेल्या एका पत्रकात माहिती देण्यात आली आहे की, फलाट तिकिटे ही सीएसएमटी, दादर, कुर्ला आणि एलटीटी आदी स्थानकांवर विक्री करण्यात येतील पण त्यांच्या संख्येवर काही निर्बंध घालण्यात येतील. हे निर्बंध गर्दीचे व्यवस्थापन करण्यास सहाय्यभूत होतील यात काही शंका नाही. वास्तविक रेल्वे प्रशासनाने ही उपाययोजना अगोदरच करायला हवी होती. पण रेल्वने तसे केले नाही ही वस्तुस्थिती आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचा अर्थ असा होतो की, हवशे-गवशे आणि नवशांना तिकीट आता विक्री केली जाणार नाही. आता हे कसे ठरवणार हा प्रश्नच आहे. मात्र वृद्ध व्यक्ती आणि आजारी माणसाना यातून सुट्टी देण्यात आली आहे. याचे एक कारण असे सांगण्यात येते की, अनेक जण फलाट तिकीट काढून रेल्वे डब्यांतील आपल्या आसनापर्यंत पोहोचवण्यासाठी येतात. त्यांची काहीच गरज नसते. पण गर्दीचे योग्य नियोजन आणि सुसूत्रता राखण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. ८ नोव्हेंबरपर्यंत फलाट तिकिटाच्या विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. दिवाळी आणि छट पूजेनिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी होत आहे. छट पूजेनिमित्त बिहार आणि उत्तर प्रदेशात जाणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी होते.

वास्तविक आता रेल्वेची व्यवस्था उत्तम झाली आहे. अपघातांची संख्या रोडावली आहे. पूर्वीसारखे अपघात होत नाहीत. पण रेल्वे प्रशासनाची काही मजबुरी आहे आणि त्यात समावेश आहे तो अपुऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा. या पूर्वी अनेक घटना घडल्या आहेत. ज्यांनी अनेक जणांचा बळी घेतला आहे आणि त्यात एलफिन्स्टन रोज स्थानकावरील चेंगराचेंगरीचा समावेश आहे. यापेक्षाही अनेक घटना आहेत.

निवडणूक अधिकाऱ्यांनी केली सिंदखेडराजा मतदारसंघांतील पाहणी

दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने निवडणूक सामान्य निरीक्षक नरेश झा आणि निवडणूक खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांचे बुलढाणा जिल्ह्यात आगमन झाले असून त्यांचे आज सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी सामान्य निरीक्षक नरेश झा आणि खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांचे स्वागत केले.

निवडणुकीच्या अनुषंगाने आज नरेश झा आणि दानिश अब्दुल्ला यांनी सिंदखेडराजा येथील सुरक्षा कक्षाला भेट देऊन तेथील सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. सुरक्षेच्या दृष्टीने काही महत्वाच्या सूचना झा यांच्याकडून देण्यात आल्या. मतदान यंत्रे सुरक्षा कक्षाची पाहणी केली आहे तसेच उउढत च्या सुरक्षितेविषयी खातरजमा झा यांच्याकडून करण्यात आली.

निवडणुकीच्या अनुषंगाने फिरते पथक, स्थिर पथक यांची संख्या सद्यस्थितीमध्ये पुरेशी आहे, आंतर जिल्ह्याच्या ठिकाणी चेक पोस्ट सक्रिय आहे, उ-ींळसळश्र ऍपवर येणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक नवीन टीम गठीत करण्यात आली आहे, इत्यादी विषयाचा आढावा घेण्यात आला.

सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातील कायदा व्यवस्था, संवेदनशील मतदारसंघ याबद्दल आढावा घेतला.

सामान्य निरीक्षक नरेश झा आणि खर्च निरीक्षक दानिश अब्दुल्ला यांच्याकडून सिंदखेडराजा मतदारसंघांमध्ये स्थापन केलेल्या सावरगाव माळ आणि बोराखेडी बावरा येथील दोन डडढ पथकाला भेटी देण्यात आल्या. बोरखेडी बावरा येथील डडढ पथक प्रमुख अनिकेत राठी, सहाय्यक राहुल खेडकर, पोलीस सहाय्यक ज्ञानेश्वर चमकुरे, नोडल अधिकारी जीवन राठोड यांना गाडी तपासणी करताना ड्राइवर सीट च्या खाली पाहणी करावी, मागील डिकीमध्ये व्यवस्थित पाहणी कारवी, गाडीच्या बोनेट तसेच गाडी मधील बॅग, पिशवी, पोते अश्या काही संशयास्पद वस्तूंची पाहणी करण्याच्या काही महत्त्वाच्या सूचना दिल्या नरेश झा यांनी डडढ पथकातील कर्मचाऱ्यांना दिल्या.

आजच्या आढावा दौऱ्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार सिंदखेड राजा अजित दिवटे , तहसीलदार देऊळगावराजा वैशाली डोंगरजाळ , गट विकास अधिकारी सिंदखेडराजा मुकेश माहोर, निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेडराजा मनोज सातव, निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रवीण घोटकर, नायब तहसीलदार सिंदखेड राजा अस्मा मुजावर, नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, प्र. नायब तहसीलदार नितीन बढे, प्रसार माध्यम नोडल अधिकारी अंकुश म्हस्के इत्यादी उपस्थित होते.

प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत ॲड.चंद्रसेन पाटील यांची उमेदवारी दाखल

विजय संकल्प रॅलीला अभुतपूर्व प्रतिसाद : प्रा.लक्ष्मण हाके, अमन आंबेडकर, नवनाथ वाघमारे यांची उपस्थिती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/लोहा : लोहा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी ओबीसी बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, बहुजन रिपब्लिक सोशॉलिस्ट पार्टी, लोकराज्य पार्टी, जनहित लोकशाही पार्टीचे अधिकृत उमेदवार ड.चंद्रसेन पाटील सुरनर यांनी मंगळवारी, २९ ऑक्टोबर रोजी सकाळी प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत व ढोलताशांचा गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत शक्तीप्रदर्शन करीत नामांकन अर्ज दाखल केले आहे. यावेळी ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके, रिपब्लिकन सेनेचे युवा नेते अमन आंबेडकर, ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांची विशेष उपस्थिती होती.

माळाकोळी गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य ओबीसी नेते चंद्रसेन पाटील हे मागील वीस वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहेत. माळाकोळी गटाचे सदस्य असताना आपल्या कामाची चुणुक त्यांनी जिल्हाभर दाखवली आहे. ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी त्यांनी लढा उभारला आहे. ओबीसी आरक्षण संरक्षणासाठी लढा उभारलेले प्रा.लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्या आंदोलनात चंद्रसेन पाटील यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे. चंद्रसेन पाटील यांनी वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी मागणी केली होती. मात्र उमेदवारी मिळाली नाही. मात्र तरीही ते मोठ्या ताकतीने निवडणुक रिंगणात उतरले आहेत. त्यांना ओबीसी नेते लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांची खंबीर साथ मिळत आहे. ओबीसी बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, बहुजन रिपब्लिक सोशॉलिस्ट पार्टी, लोकराज्य पार्टी, जनहित लोकशाही पार्टी या आरक्षणवादी आघाडीने त्यांना उमेदवारी दिली आहे. मंगळवारी, २९ ऑक्टोबर रोजी नामांकन दाखल करण्यासाठी काढण्यात आलेल्या विजय संकल्प रॅलीत लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघातून नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी उपस्थित जनसमुदाय अगदी उत्साहात सहभागी झाला होता. यावेळी देण्यात येणाऱ्या घोषणा व स्लोगन लक्षवेधी ठरले. हर ओबीसी की पुकार, अबकी बार बहुजन आमदार, चला ऐतिहासिक लढाईचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने सामील व्हा, बहुजन आमदार करण्यासाठी हर ओबीसी की पुकार, अबकी बार चंद्रसेन पाटील सुरनर आमदार, ओबीसी आरक्षण विरोधींना पाडणार, ओबीसीचा आमदार निवडुन आणणार, देऊ आता एकच नारा, करु बहुजन एक सारा, सर्व ओबीसी, बहुजनांनी करु निर्धार, लोह्याचा आता बदलु आमदार, अशा घोषणांनी परिसर दणाणला होता.

पारंपरिक वेशभुषेत बंजारा महिला उपस्थित

ॲड.चंद्रसेन पाटील सुरनर यांच्या नामांकन दाखल करण्यासाठी काढण्यात आलेल्या विजय संकल्प रॅलीमध्ये बंजारा समाजाच्या महिला पारंपरिक वेशभूषेत हजर होत्या. पारंपरिक वाद्यांच्या तालावर बंजारा व ओबीसी गीत गात महिला भर उन्हातान्हात दिवसभर रॅलीत उपस्थित होत्या.

वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार दिनेश पंचभाई यांचा उमेदवारी अर्ज दाखल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बोंडगांव देवी/प्रतिनिधी : ६३-अर्जुनी मोर विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिनेश रामरतन पंचभाई यांनी सोमवार दि.२८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला. उपविभागीय कार्यालय अर्जुनी मोरगांव येथील उपविभागीय अधिकारी वरूनकुमार शहारे यांच्याकडे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दिनेश पंचभाई यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

अर्जुनी मोर शहरातील दुर्गा चौक येथून भव्य अशी वाजत गाजत रॅली काढण्यात आली. अर्जुनी मोरगांव शहरातील अंबिका वस्त्रालय ते सरळ खरेदी विक्री, महाराणा प्रताप चौक सरळ मेन रोड उपविभागीय कार्यालय या मार्गे रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या रॅलीचा समारोप उपविभागीय कार्यालयासमोर करण्यात आला. या रॅलीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा.सतीश बन्सोड वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष महादेव सलामे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव राजू राहुलकर अर्जुनी मोरगाव तालुकाध्यक्ष किशोर तागडे, सडक अर्जुनी तालुकाध्यक्ष सुखदास मेश्राम, अर्जुनी मोरगाव युवा तालुकाध्यक्ष कैलास इस्कापे सडक अर्जुनी युवा तालुकाध्यक्ष पुरुषोत्तम रामटेके, अनिल उके, आदर्श रामटेके हर्षपाल लोणारे, रोहित रामटेके, लोमेश सांगोळे, प्रतिक रामटेके बाबूदान मेश्राम, आकाश तागडे आणि सर्व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी तसेच हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित होते आदींसह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषी बी बियाणे सह सोयाबीन गेले चोरीस शेतकऱ्यास बसला ५० हजाराचा फटका

नळदुर्ग परिसरात गोर गरीब शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी पोलीसांचा ताफा वाढला

नळदुर्ग जवळ वागदरी शिवारात शेतकऱ्यांच्या सोयाबीनवर चोरांच्या धाडी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग आणि परिसरामध्ये वागदरीच्या शिवारामध्ये एका पत्र्याच्या शेडमध्ये गरीब शेतकरी शिक्षा रमेश जिटीथोर यांनी शेतातील सोयाबीनची रास करून ७० किलो वजनाचे सोयाबीनचे पोते भरून ठेवले होते परंतू सदरील अज्ञात चोरट्यांनी या सोयाबीनवर चांगलाच डल्ला मारला असून यामध्ये कृषी बी बियाणे ची ही चोरी खूप मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे .

या संदर्भात सदरील नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध शिक्षा जिटीथोर यांनी फिर्याद दिली आसुन आज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे

सविस्तर माहिती अशी की वागदरी गावाच्या शिवारात शेतकरी महिला शिक्षा रमेश जिटीथोर व त्यांचे पती रमेश जिटीथोर हे दोघे शेती बघतात वागदरी शिवारात यांच्या शेतात पत्र्याचे शेड मारले आसुन या शेड मधील ७० किलो वजनाचे सोयाबीनचे ३० पोते व ३० किलो वजनाचे कृषी बी बियाण्याचे ३० किलो वजनाचे ११ पोते असे एकूण ४१ पोत्यांची चोरांनी चोरी केली आहे याची सदरील अंदाजे किंमत ५५ हजार ६०० रुपये एवढी असून .या गरीब शेतकऱ्यावर परत एक बार चोरट्या कडून संकट ओढवले आहे. सदरील अज्ञात चोरट्याविरुद्ध नळदुर्ग पोलिस ठाण्यामध्ये नळदृग ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली ३३४ १ व ३०५ ऐ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिसात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद झाला असून नळदुर्ग ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग आणि परिसरात पोलिसांचा ताफा खुप मोठ्या प्रमाणात गस्त घालत आसल्याचे दिसुन येत आहे गोर गरीबांच्या शेतकऱ्यावर डल्ला मारणाऱ्या चोरट्यांना लवकरच पकडण्याचा ध्यास नळदुर्ग पोलिसांनी घेतला आहे .

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

थोडक्यात...

चोरट्याने एक लाखाचे सोन्याचे दागिने चोरले

सोलापूर, (प्रतिनिधी) : चाटी गल्ली येथील आपटे ज्वेलर्स जवळील फुलवारी किलबिल किड्स वेअर येथे फिर्यादी शोभा गणपत सावंत (वय-५०-,रा.म.दहिवडी,पो.मसला,ता. तुळजा-पूर) यांच्या खांद्याला अडकवलेली पिशवी मधील व सून पूजा सावंत यांचे जुने वापरते सोन्याचे मिनी गंठण पिशवी ठेवलेल्या सोन्याच्या वस्तू असा एकूण एक लाखांचा ऐवज अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेल्याची फिर्याद शोभा सावंत यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २७ सप्टेंबर रोजी दुपारी दोन ते पाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार शिवशरण हे करीत आहे.

अण्णासाहेब प्रशालेजवळील अपघातात महिला जखमी; चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : अण्णासाहेब प्रशाले जवळ झालेल्या अपघात प्रकरणी महिला जखमी झाल्याची घटना १२ ऑक्टोंबर रोजी सकाळी सात ते साडेसात वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी श्रीदेवी मलकप्पा तळवळ (वय-४०,रा. वर्धमान नगर,शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या सासरी अण्णासाहेब प्रशा-लेजवळ दसरा असल्याकारणाने आपट्याचे पाने देण्याकरिता दूचाकीवरून जात असताना दयानंद कॉलेज ते जोडभावी पेठ दरम्यान ओरियंट टर्न वर्क दुकानासमोरून पाठीमागून येणाऱ्या अज्ञात कारचालकाने फिर्यादी यांच्या दुचाकीला मागून धडक देऊन गंभीर जखमी करत पळून गेला आहे. अशा आशयाची फिर्याद श्रीदेवी तळवळ यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

पत्नीचा छळ करून क्रूर वागणूक; पती, दुसऱ्या बायकोसह चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : पत्नी सासरी नांदत असताना तिला आर्थिक, मानसिक व शारीरिक छळ करून अत्यंत क्रूर वागणूक देऊन सतत तू मर असे सांगून व माहेरून दहा लाख रुपये आण असे म्हणत छळ केल्याप्रकरणी पतीसह चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.९ फेब्रुवारी २००९ ते आस्थागायत पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी रंगभवन येथे घडली. याप्रकरणी सुचिता अविनाश चव्हाण (वय-३८,रा.आयकर नगर,रंगभवन) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती अविनाश चव्हाण, सासु मंगल नणंद, वर्षा चव्हाण व फिर्यादीच्या पतीची दुसरी बायको रोमा चव्हाण (सर्व.रा.आयकर नगर, रंगभवन) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत भरला अभिजीत पाटलांनी अर्ज

३० वर्षाच्या अन्यायाविरोधात माढ्यात परिवर्तनाची लाट; हजारो लोकांच्या साक्षीने अभिजीत पाटलांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

माढा/प्रतिनिधी : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार म्हणून माढा मतदारसंघांम धून अभिजीत पाटील यांनी काल अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केला. शिंदे यांनी गेल्या तीस वर्षात सत्ता असूनही विकास न केल्याने उमेदवारीसाठी पवार साहेबांचे उंबरे झिजवण्याची वेळ आली. मात्र त्यांना तरीही संधी मिळाली नाही. गेल्या तीस वर्षांत सत्ताधारी लोकांनी केलेल्या अन्यायाच्या विरोधात माढ्यात असंतोषाची लाट असून लवकरच माढ्यामध्ये परिवर्तन होणार असल्याचे अभिजीत पाटील यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांचा अर्ज दाखल करण्यासाठी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खा-सदार धैर्यशील मोहिते -पाटील तसेच माळशिरस मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार उत्तमराव जानकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र गटाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, बप्पा देशम ुख, ज्योतीताई कुलकर्णी, मदन पाटील, भगत सर, आबासाहेब साठे, भारत पाटील, शेतकरी संघटनेचे शिवाजी पाटील, प्रताप पिसाळ, प्रशांत पाटील, औदुंबर महाडिक, सुवर्णा शिवपुजे, ऋतुजा सुर्वे, रत्नप्रभा जगदाळे हे उपस्थित होते. सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास अभिजीत पाटील यांनी या सर्वांच्या तसेच हजारो मतदारांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

गेल्या अनेक दिवसांपासून म ाढ्यातील उमेदवारी बाबत सस्पेन्स कायम होता. मात्र श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी शेवटच्या क्षणापर्यंत हार न मानता तुतारीची उमेदवारी आपल्या पदरात पाडून घेत माढ्यातील गुंता सोडविला आहे. या मतदारसंघातून आमदार बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजीत शिंदे हे हि इच्छुक होते मात्र अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी शरद पवार गटाने माढ्यातून अभिजीत पाटील यांना उमेदवारी जाहीर करत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. सध्या या मतदारसंघात तुतारी चिन्हाची क्रेझ असल्याने अभिजीत पाटील यांच्यासाठी ही लढाई सोपी असल्याचे मानले जात असून त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे. काल उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर अभिजीत पाटील यांनी उपस्थित लोकांना संबंधित करत गेल्या ३० वर्षांपासून माढ्यातील लोकांमध्ये अन्यायाची भावना असून त्याविरोधी लाट असल्याचे सांगितले.तसेच या विरोधात सक्षम उमेदवार नसल्याने आजवर लोकांचा नाईलाज होता. मात्र आता त्यांना सक्षम नेतृत्व मिळाल्याने लोकांसम ोर एक पर्याय उभा राहिला आहे. त्यामुळे यंदा सत्ता परिवर्तन अटळ असल्याचे त्यांनी सांगितले.

त्याचबरोबर त्यांनी विरोधी उमेदवार रणजीतसिंह शिंदे यांच्यावर टीकास्त्र सोडत गेल्या ३० वर्षाच्या काळात माळा हा वैद्यकीय सेवा सुविधा, तसेच शिक्षण क्षेत्रात मागे का राहिला याबाबत जाब विचारला ,सोबतच ही साखर कारखान्याची निवडणूक नसून ही आमदारकीची निवडणूक असल्याने विरोधकांनी आमदारकी व विकासावरच बोलावे. कारखान्याबाबत बोलणार असाल तर तुमचं सगळच माझ्याकडे असून परिणामांना सामोरे जाण्यासाठी तयार राहा असा सूचक इशारा-ही त्यांनी शिंदेंना दिला. यावेळी अभिजीत पाटील यांचा अर्ज दाखल करण्यासाठी पंढरपूरसह माळशिरस तालुक्यातील हजारो लोक उपस्थित होते.

अज्ञात वाहनाच्या धडकेत मुलाचा मृत्यू; अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (प्रतिनिधी) : अज्ञात वाहनाच्या धडकेत एका मुलाचा मृत्यू झाल्याची घटना दि.२२ ऑक्टोंबर रोजी रात्री अक्कलकोट रोड येथील सर्विस रोडवर घडली. याप्रकरणी निर्मला किशोर शेवाळे (वय-६०-,रा.शुक्रवार पेठ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांचा मुलगा आनंद शेवाळे हा अक्कलकोट रोडवरील सर्विस रस्त्यावरून गणपती घाटाजवळ फुटपाथवर बेशुद्ध मिळून आला म्हणून पोलिसांनी सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचाराकरिता दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.तसेच त्याच्या पाठीवर खरचटल्याने व जखमा फिर्यादी यांनी पाहिल्या असून, डॉक्टरांनी मृत्यूच्या कारणांम ध्ये बरगड्यास जोराने धडक बसल्याने मृत्यू झाल्याचे सांगितले. कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालून धडक दिली आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास मसपोनि. घोरपडे या करीत आहेत.

जिल्ह्यात निवडणूक आयोगाकडून ११ विधानसभा मतदारसंघासाठी तीन निवडणूक खर्च निरीक्षक यांची नियुक्ती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (जिमाका) : भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केलेला असून २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान तर दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीची प्रक्रिया होणार आहे. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघासाठी राजकीय पक्ष व उम ेदवारांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकाऱ्यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

निवडणूक खर्च निरीक्षक यांचे नावे व खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आलेले विधानसभा मतदार संघ पुढीलप्रम ाणे...

श्री. के. पी. जयकर-

श्री. के. पी. जयकर हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. पंढरपूर, माळशिरस व सांगोला या तीन विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त तीन विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्चाची संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ती तक्रार ९९ ६२ ४५ २५ ० २ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा क्षशूरज्ञरी. ाूसारळश्र.लो या मेल्वर करावी, असे आ-वाहन त्यांनी केले आहे.

श्रीमती बी. ज्योती किरण-

ह्या केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. करमाळा, माढा, बार्शी व मोहोळ या चार विधानसभा मतदारसंघासाठी त्या निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ९४२५०१०५०० या भ्रमणध्वनी क्रम ांकावर किंवा क्षीळज्ञळीरपलर्सी.ळप या मेलवर करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

श्री. मीना तेजराम श्रीमनलाल-

हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. सोल-ापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, अक्कलकोट व सोलापूर शहर दक्षिण या चार विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत.उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ९५१५२५२५९४ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ींशक्षीरा. ाशशपरर्सी.ळप या मेलवर करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक सुबोधकुमार यांचे अकलूज येथे आगमन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : २५२-पंढरपूर, २५३-सांगोला व २५४-माळशिरस (अ.जा.) या तीन विधानसभा मतदारसंघासाठी श्री. सुबोधकुमार, भा.प्र.से. यांची सर्वसाधारण निरीक्षक म्हणून भारत निवडणूक आयोगाने नियुक्ती केली असून आज दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांचे आगमन २५४-म ाळशिरस (अ.जा.) मतदारसंघांतर्गत अकलूज येथे झाले आहे.

निवडणूक कालावधीत मा.सर्वसाधारण निरीक्षक श्री. सुबोधकुमार, भा.प्र.से. यांचे वास्तव्य शासकीय विश्रामगृह, महर्षि चौक, अकलूज, ता.माळशिरस येथे असणार आहे. त्यांचा भ्रमणध्वनी क्र.८९९९२७९००९ हा असून नागरिकांना मा.निरीक्षक यांना दौऱ्याचे दिवस सोडून इतर दिवशी सकाळी ११ ते १२ या कालावधीत सभागृह, शासकीय विश्रामगृह, अकलूज, माळशिरस येथे संपर्क साधता येईल असे कळविण्यात आले आहे.

हे उपकरण फार्मसीच्या कंपन्यांमध्ये व फार्मसीच्या महाविद्यालयांमध्ये फायदेशीर ठरणार

स्वेरीच्या शिरपेचात मानाचा तुरा

स्वेरी फार्मसीतील प्राध्यापकांच्या पेटंटला भारत सरकारकडून मान्यता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : गोप-ाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राध्यापक डॉ. वृणाल मोरे, प्राचार्य डॉ. मिथुन मणियार आणि डॉ. प्राजक्ता खुळे यांनी फाईल केलेल्या 'परॅटस फॉर मेजरींग स्प्रेडाबिलिटी ऑफ सेमी सॉलिड फॉर्मुलेशन' या पेटंटला भारत सरकारच्या पेटंट विभागाकडून मान्यता मिळाली आहे. या पेटंटच्या यशस्वीतेसाठी स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे तसेच स्वे-रीचे युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

फार्मसीचे क्षेत्र नेहमीच नवनवीन संशोधनांमध्ये अग्रेसर असते.त्याप्रम ाणेच विविध औषधनिर्माण कंपन्या आणि महाविद्यालयांमध्ये विविध प्रकारच्या उपकरणांची आवश्यकता असते ही गरज लक्षात घेऊन स्वेरीज

स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्राध्यापकांनी फाईल केलेल्या पेटंटला भारत सरकारच्या पेटंट विभागाकडून मान्यता प्राप्त झाली असून डावीकडून बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डॉ. वृणाल मोरे व डॉ. प्राजक्ता खुळे.

कॉलेज ऑफ फार्मसीचे डॉ. वृणाल मोरे यांनी त्यांच्या टीम सोबत 'परॅटस फॉर मेजरींग स्प्रेडाबिलिटी ऑफ सेमी सॉलिड फॉर्मुलेशन' हे आधुनिक उपकरण बनवले आहे. हे उपकरण सेमी सॉलिड डोसेज फॉर्म साठीच्या सरकारच्या फार्मा स्टँडर्ड च्या 'स्प्रेडाबिलिटी टेस्ट' या चाचणीसाठी उपयुक्त ठरणार आहे. स्प्रेडेबिलिटी हे सेमी सॉलिड औषधांचे एक महत्त्व-पूर्ण वैशिष्ट्य आहे. स्प्रेडेबिलिटी चाचणी ही औषध किती सोयीस्कर रित्या पसरते ते दर्शविते. स्प्रेडेबिलिटी चाचणी ही क्रीम, ऑइंटमेंट, जेल यासारख्या सेमी सॉलिड डोसेज फॉर्म जे की त्वचेवर लावले जा-तात त्यासाठी महत्त्वाची आहे. त्व-चेवर लावायच्या औषधाची परिणाम कारकता ही पेशंटने अचूक डोस त्वचेवर समान पसरवण्यावर अवलंबून असते; यासाठी स्प्रेडेबिलिटी ही चाचणी करावी लागते. आतापर्यंत ही तपासणी मॅन्युअल पद्धतीने केली जात होती त्यासाठी बराच वेळ जात होता आणि मॅन्युअल पद्धतीने अचूक परिणामकता मिळत नव्हती. आता स्वेरी फार्मसीच्या प्राध्यापकांनी तयार केलेल्या ह्या उपकरणामुळे कमी वेळात आणि अगदी अचूकपणे ही चाचणी प्रक्रिया करता येणार आहे. फार्मसी क्षेत्रात वापरले जाणार्या बहुसंख्य सेमी सॉलिड औषधांची स्प्रेडेबिलिटी चाचणी या आधुनिक उपकरणाच्या सहाय्याने सहज आणि तंतोतंतपणे करता येणार आहे. स्वेरीच्या प्राध्यापकांनी तयार केलेल्या या मशीनची हाताळणी ही खूप सोयीस्कर आहे. हे उपकरण 'सेन्ट्रीफ्युगल फोर्स' या तत्त्वावर काम करते. चाचणीसाठीच्या औषधाचे सॅम्पल उपकरणांमध्ये असलेल्या डिस्कवर ठेवावे लागते. सँपलचे प्रमाण ह्या उपकरणांमध्ये निश्चित ठेवण्यात आलेले आहे. ०.५ ग्रॅम ते १ ग्रॅम सँपल घेवून नंतर ते डिस्कवर इलेक्ट्रिक मोटरच्या साह्याने एक विशिष्ट आर.पी.एम. ला ०.५ मिनिट ते १ मिनिट फिरवले जाते. औषधाचे सँपल किती त्वचेवर पसरले आहे हे या उपकरणांमध्ये डिझायनर द्वारे दर्शवली जाते; तर नंतर सॅम्पल ची स्प्रेडाबिलिटी ही प्लेटवर पसरले असलेल्या सॅम्पल वरून ठरवली जाते. स्वेरीच्या प्राध्यापकांनी हे उपकरण मॅन्युअल चुका टाळणे आणि स्प्रेबिलिटी ही चाचणी अधिक अचूक आणि सोपी करणे ही उद्दिष्टे विचारात घेऊन निर्माण केले आहे. स्वेरी प्राध्यापकांच्या संशोधनाने तयार झालेले हे उपकरण वापरण्यास सोपे, जलद परिणाम देणारे आणि सोपी संरचना असलेले आहे. एकूणच हे उपकरण फार्मसीच्या कंपन्यांमध्ये व फार्मसीच्या महाविद्यालयांमध्ये फायदेशीर ठरणार आहे, असे या पेटंटचे मुख्य संशोधक प्राध्यापक डॉ. वृणाल मोरे यांनी सांगितले. 'भारत सरकारकडून मान्यता प्राप्त झालेले हे एक डिझाईन पेटंट आहे.' अशी माहिती कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली. भारत सरकारकडून या पेटंटचे प्रमाणपत्र मिळाले असून या पेटंट म ध्ये प्राचार्य डॉ. मिथुन मणियार आणि डॉ. प्राजक्ता खुळे हे सहसंशोधक आहेत. या पेटंटवर डॉ. वृणाल मोरे आणि त्यांच्या टीमने बरेच दिवस मेहनत घेतल्यानंतर त्यांना हे यश मिळाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे, स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी पेटंट मधील टीमचे अभिनंदन केले.

थोडक्यात...

विवाहितेचा छळ; पतीसह सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून विवाहितेला अर्धा तोळ्याची चैन,रोख रक्कम ४० हजार रुपये व तसेच व्यवसायाकरिता ५ लाख रुपये आई-वडिलांकडून घेऊन ये नाहीतर तुला आम्ही नांदवणार नाही.असे म्हणत मारहाण करत अपमानास्पद वागणूक देऊन शारीरिक व मानसिक त्रास दिला असल्याची फिर्याद अंकिता श्रीकांत कंची (वय-१९,रा.एफ ग्रुप,लक्ष्मी चौक) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती श्रीकांत कंची,सासू विजयालक्ष्मी,सासरे दयानंद,नणंद शरयू,नंदेचा नवरा नवीन कोटासर्व (सर्व. रा.कोटा नगर,विडी घरकुल) व नणंद निकीता बोल्ली (रा.हैदराबाद) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १६ ऑगस्ट २०२३ ते १८ ऑक्टोंबर २०२३ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. पुढील तपास पोलीस हवालदार कटके हे करीत आहेत.

मोटार सायकलवरून खाली पडून वृद्ध महिलेचा मृत्यू; अज्ञात इसमावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मोटार सायकल वरून खाली पडून वृद्ध महिलेच्या डोक्याला गंभीर इजा होऊन मृत्यू झाल्याची घटना २३ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दहिटणे येथे घडली.मैनाबाई दिगंबर पवार (वय-५९) असे मृत्यू झालेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे.याप्रकरणी संदीप दिगंबर पवार (वय-३०,रा.कासेगाव तालुका दक्षिण सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,संशयित आरोपीने गावातील श्रीपाद यादव यांच्या मालकीची मोटार सायकल क्रमांक एमएच.१३.ईएच.२२८७ यावर फिर्यादी यांची आई बहिणाबाई पवार यांना मागे बसवून राहत्या घरातून गॅस केवायसी करण्यासाठी जुना विडी घरकुल येथे जात असताना संशयित आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी भरधाव वेगात चालून स्पीड बेकरवर जोरात चालवल्याने त्यात फिर्यादी यांची आई मोटार सायकल वरून खाली पडून त्यांच्या डोक्यात मार लागून जखमी होऊन मयत झाली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार साळुंखे हे करीत आहेत.

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून हिंदू महासभेकडून संजय साळुंखे यांनी भरला अर्ज

विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विरोधातील उमेदवारांमध्ये आणखी एकाची भर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी : शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातून हिंदू महासभेकडून संजय साळुंखे यांनी मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज सादर केला. विद्यमान आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विरोधातील उमेदवारांमध्ये संजय साळुंखे यांच्या अर्जामुळे आणखी एकाची भर पडली आहे.

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या कारभारावर जनता नाराज असून भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठांनी आमदार देशमुख यांना पुन्हा उमेदवारी देऊ नये अशी मागणी भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वाला करणाऱ्यांमध्ये संजय साळुंखे यांचे नाव आघाडीवर होते. शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात आमदार विजयकुमार देशमुख यांच्यावर नाराज असणाऱ्या नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची जुळवाजुळव गेल्या अनेक महिन्यांपासून संजय साळुंखे हे करीत होते. सलग ४ वेळा आमदार विजयकुमार देशमुख यांना उमेदवारी दिल्यामुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी असल्याची भूमिका घेऊन संजय साळुंखे यांच्यासह देशमुख विरोधी गटाने शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात राळ उडवून दिली होती.

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात राहिलेली विकासकामे, तरुणांना अपेक्षित रोजगार, काम गारांचे प्रश्न, हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांवर होणारा अन्याय आदी मुद्दे घेऊन आपण ही निवडणूक लढवीत असल्याचे शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे हिंदू महासभेचे उमेदवार संजय साळुंखे यांनी सांगितले.

संजय साळुंखे यांनी गेल्या काही वर्षांपासून श्रीराम जन्मोत्सव समितीच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक काम केले आहे. या संपर्काचा फायदा या विधानसभा निवडणुकीमध्ये होणार असल्याचा दावा उमेदवार संजय साळुंखे यांनी उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर केला. सर्वसामान्य नागरिकांच्या, कार्यकर्त्यांच्या थेट संपर्कात असणे, सामाजिक कार्यात अग्रेसर राहणे या मुद्द्यांवर मी निवडणुकीला सामोरे जात आहे. भाजपाच्या काही नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा उघड तर काही नेत्यांचा आणि कार्यकर्त्यांचा मला छुपा पाठिंबा आहे. त्यामुळे या निवडणुकीत माझा विजय निश्चित आहे, असे हिंदू महासभेचे उमेदवार संजय साळुंखे यांनी सांगितले. संजय साळुंखे यांच्या उमेदवारीमुळे शहर उत्तर मधील हिंदुत्ववादी मतदानात मोठे विभाजन होणे अटळ आहे.

याप्रसंगी वेदमूर्ती पंडित वेणुगोपाल जिल्हा, अमरनाथ बिराजदार, विश्वनाथ दुर्लेकर, रमेश पांढरे, अबु चौगुले, अर्जुन मोहिते, राजू निंबाळकर, अनिल चौगुले, काशिनाथ आनंदकर आदी उपस्थित होते.

धरित्री विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरीय रंगभरणा स्पर्धेत मिळविले घवघवीत यश; दिवाळी आधीच रंगांची व बक्षिसाची आतिषबाजी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी, (एस.के.गायकवाड) : नळदुर्ग ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीतील शंभर विद्यार्थ्यांनी विश्व क्रिएशन्स द ट्रॉफी शोरूम आयोजित जिल्हास्तरीय भव्य रंगभरण स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमध्ये प्रत्येक महिन्याला एक चित्र रंगवून दिले होते.यामध्ये जुलै महिन्यात पाचवी ते सहावी गटातून गौरी टेकाळे हिला गोल्ड मेडल व सर्टिफिकेट तर केदार धोंडीबा याला ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट मिळाले. इयत्ता सातवी ते दहावी या गटातून आठवीतील शर्वरी पुराणिक हिला गोल्ड मेडल व सर्टिफिकेट,कृष्णा बागल याला सिल्वर मेडल व सर्टिफिकेट, शर्वरी ठाकूर हिला उत्तेजनार्थ मेडल व सर्टिफिकेट तर इयत्ता दहावीतील

भाग्यश्री पिस्के हिला ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट मिळाले.

ऑगस्ट महिन्यातील विजेत्यांमध्ये इयत्ता सहावीतून समर्थ फडणवीस याला सिल्वर मेडल व सर्टिफिकेट व पृथ्वीराज नवनाथ गवळी याला ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट मिळाले. इयत्ता सातवी ते दहावी या गटातून इयत्ता दहावीतील श्रुती भूमकर हिला गोल्ड मेडल व सर्टिफिकेट, इयत्ता नववीतून चेतन तोगगे याला सिल्वर मेडल व सर्टिफिकेट तर इयत्ता नववीतील गायत्री वाघमारे तुला ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट मिळाले. तसेच कुणाल अंगुले याला उत्तेजनार्थ पदक व सर्टिफिकेट मिळाले.

सप्टेंबर महिन्यातील विजेत्यांमध्ये इयत्ता पाचवी ते सहावी या गटातून इयत्ता सहावीतील राजनंदिनी बागल हिला सर्व सिल्वर मेडल व सर्टिफिकेट तर अभी इरकल ला ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट मिळाले.इयत्ता सातवी ते दहावी या गटातून आठवीतील शबनम मोंदल हिला गोल्ड मेडल व सर्टिफिकेट तर संयोगीता राठोड हिला सिल्वर मेडल व सर्टिफिकेट, इयत्ता नववी तील प्रणव हजारे याला ब्राँझ मेडल व सर्टिफिकेट तर इयत्ता दहावीतील राधा सूर्यवंशीला उत्तेजनार्थ मेडल व सर्टिफिकेट मिळाले .या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे महाराष्ट्र राज्यआदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक सुनील पुजारी व चित्रकला शिक्षक रमेश चव्हाण यांनी मार्गदर्शन केले तसेच इतर सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

ज्ञानदीप कलोपासक मंडळाचे अध्यक्ष बाबुराव चव्हाण, उपाध्यक्ष भीमराव मोरे, सचिव एडवोकेट सयाजी शिंदे, सहसचिव वसंतराव रामदासी, कोषाध्यक्ष मल्लिनाथ माळगे, सदस्य दत्तात्रय जोमदे, नरसिंग माकणे,किरण पाटील, सुभाष दासकर, नीताताई पाटील व अर्चनाताई डुकरे यांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

खंडणी मागणारा सराईत गुन्हेगार योगेश कोळेकर स्थानबद्ध

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (प्रतिनिधी) : सातत्याने घातक शस्त्राचा वापर करून खुनाचा प्रयत्न करणे घातक शस्त्रांनी इच्छापूर्वक दुखापत करणे,जबरी चोरी,खंडणी मागणे,गैर कायद्याची मंडळी जमवणे दगडफेक करणे अशा प्रकारचे तीन गंभीर स्वरूपाचे गुन्हे व दोन अदखलपात्र गुन्हा दाखल असलेला सराईत गुन्हेगार योगेश रामचंद्र कोळेकर (वय-२५,रा.न्यू बुधवार पेठ) याला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले आहे. योगेश कोळेकर याला त्याच्या गुन्हेगारी करवायापासून प्रवृत्त करण्यासाठी सन २०२१ मध्ये क्रं.१०७ फौ.प्र.सं अधिनियमानुसार प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर ही त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेत बादा होईल अशी गुन्हेगारी कृत्य चालूच ठेवली. त्यामुळे त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी २५ ऑक्टोंबर रोजी त्याच्याविरुद्ध एमपीडीए अधिनियम १९८१ चे कलम ३ अन्वये स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित करून त्याला येरवडा कारागृह पुणे येथे दाखल करण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त २ यशवंत गवरी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे, सुहास चव्हाण,एमपीडीए पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम घाडगे व पोलीस हेडकॉन्स्टेबल विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव विशाल नवले यांनी केली आहे.

इंदापूर तालुक्यातून अंगणवाडी सेविकांनी केली फाशीच्या शिक्षेची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर तालुका प्रतिनिधी अतुल सोनकांबळे : अंगणवाडी सेविकेची निर्घुण हत्या करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा मिळावी यासाठी इंदापूर तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक कोकणे साहेब यांना निवेदन देण्यात आले.

मौजे चिंचोडी पाटील तालुका अहिल्या नगर येथील अंगणवाडी केंद्र मारुती वाडी येथील अंगणवाडी सेविका उमा महेश पवार यांची निर्गुण हत्या करण्यात आली आहे. या अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांनी सकाळी अंगणवाडी केंद्रामध्ये बालकांच्या

पालकांना पोषण आहार घेण्यासाठी अंगणवाडी केंद्रात बोलावले होते. याच वेळेस त्याची निर्गुण हत्या करण्यात आली आहे असे निवेदनात म्हटले आहे. तसेच सदर आरोपीस पोलीसांनी अटक केली आहे. अंगणवाडी कर्मचारी महिला समाजाचे आरोग्य पोषण तसेच बालकांचे पूर्व शालेय शिक्षण यासाठी सतत सेवाभावी वृत्तीने काम करतात. त्याचे काम यावर राज्याचा एकात्मिक बाल विकास सेवांमध्ये देशात अग्रक्रम असतो हे वेळोवेळी सिद्ध झालेले आहे अशा परिस्थितीत आम्ही अंगणवाडी महिला कर्मचारी समाजामध्ये महत्त्वाचे काम बजावत असताना आमच्या महिला भगिनींवर अत्याचार होतो म्हणूनच आज आम्ही इंदापूर तालुक्यातील अंगणवाडी सेविका या घटनेचा निषेध नोंदवत आहोत. शासनाने यांच्या हत्तेचे प्रकरण शिघ्रगती न्यायालयात घेऊन गुन्हेगारास कायदेशीर तरतुदीनुसार अत्यंत कडक शिक्षा करावी व यापुढे अशी कडक शिक्षा पाहून कोणीही अशा प्रकारचा गुन्हा करण्यास तयार होणार नाही ,अशी मागणी यावेळी पुणे जिल्हा उपाध्यक्ष पुनम ताई निंबाळकर यांनी केली आहे. तसेच सदर महिलेस शासनाकडून सहानुग्रह म्हणून ५० लाख रुपये अनुदान तात्काळ देण्यात यावे तसेच प्रत्येक अंगणवाडीमध्ये सुरक्षाविषयक उपायोजनासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत अशी ही मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदन देताना इंदापूर तालुक्यातील महिला अंगणवाडी सेविका या मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

विजय संकल्प रॅलीत आशाताई शिंदे यांचा निर्धार

शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने जोरदार शक्ती प्रदर्शन

हम लढेंगे भी और जितेंगे भी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लोहा : ज्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी, खुर्चीसाठी सहा पक्ष बदलले ते मतदार संघाचा विकास कसा काय करणार. लोहा कंधार मतदारसंघाची जनता आता येडी राहिली नाही. ज्या बहिणीने भावासाठी चाळीस वर्ष मदत केली. तोच तिच्यावर उलटला. लाज वाटली पाहिजे. सख्या बहिणीला बेईमान होणारा लाडक्या बहिणीचा कसा होणार. बायलेकीला धोका देणाऱ्याचे कधीच बरे होत नाही. मी लढणार. शेवट पर्यंत लढणार.

लाडका भाऊ सख्या बहिणीचा झाला नाही, तो तुमचा काय होईल, अशी टीका चिखलीकर याचे नाव न घेता शेकापच्या उमेदवार आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी करून हम लाडेंगे भी और जीतेंगे भी असा निर्धार व्यक्त केला.

लोहा कंधार विधानसभा मतदार संघासाठी आशाताई शिंदे यांनी मंगळवारी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने जोरदार शक्ती प्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आयोजित भव्य जाहीर सभेत त्या बोलत होत्या. शेकापचे राष्ट्रीय नेते भाई जयंत पाटील, आमदार श्यामसुंदर शिंदे, लोहा बाजार समितीचे सभापती विक्रांतदादा शिंदे, अनुजाताई शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शनिमंदिर येथून मंगळवारी दुपारी शेकाप, महा विकास आघाडीकडून भव्य विजय संकल्प रॅली काढून आशाताई शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

भाई जयंत पाटील म्हणाले की, मला जे २५ वर्षात जमले नाही ते आमदार शिंदेंनी पाच वर्षात करून दाखविले. २४०० कोटी चा विकास निधी आणणारा आमदार म्हणजे श्यामसुंदर शिंदे आहेत. शिंदेंनी आमदार म्हणून काम केले. पण आशाताईंनी आमदारकी चालवली. जो भाऊ स्वतःच्या बहिणीला सांभाळू शकत नाही. तो तुम्हाला कसा काय सांभाळू शकेल, असे स्पष्ट करून त्यांनी आशाताई महविकस आघाडीच्या उमेदवार आहेत. त्यांना निवडून द्या. त्या प्रभावी आमदार म्हणून विधिमंडळात काम करतील, असा विश्वास व्यक्त केला.

अर्ज भरल्यानंतर आयोजित भव्य सभेत आशाताईंनी माजी खासदार व महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांचे नाव न घेता त्यांच्यावर आसूड ओढले. पुढे बोलताना त्यांनी राज्य सरकारने निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहिण योजना आणली, पण लाडक्या बहिणीच्या सुरक्षतेकडे सरकारचे दुर्लक्ष झाल्याचे सांगितले. बेरोजगारी वाढली. महागाई वाढली. शेतकऱ्यांच्या योजना बंद करण्यात आल्याचेही त्यांनी म्हंटले.

आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, मतदारसंघाच्या विकासासाठी मी अहोरात्र प्रयत्न केला. आशाताईंना भरघोस मतांनी विजयी करा. पुढील काळात आशाताई लोहा कंधार मतदारसंघ शिखरावर घेऊन जातील. माझा मेव्हण्याने आपल्या बहिणीलाच आव्हान दिले आहे. त्याने लाज शरम विकून खाली. त्याच्या भूलथापांना बळी पडू नका. अफवांवर विश्वास ठेवू नका. आशाताईंना विजयी करा, असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी मतदारसंघातील हजारो महिला पुरुष उपस्थित होते.

रामचंद्र जंगले यांचा डॉक्टरेट पदवीने सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे/प्रतिनिधी : ठाणे शहरातील पवारनगर येथील रहिवासी ज्येष्ठ आदिवासी कवी साहित्यिक व विचारवंत आणि प्रकाशक रामचंद्र चिमाजी जंगले यांचे कवी साहित्यिक क्षेत्रातील भरीव योगदान व सामाजिक कार्य लक्षात घेता रविवार दि. २० ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील लातूर याठिकाणी युनिव्हर्सिटी ऑफ टोलोसा मेक्सिको (अमेरिका) यांच्यावतीने डॉक्टर पदवीने डॉक्टर रामचंद्र चिमाजी जंगले यांचा सन्मान करण्यात आला.